दिनांक : 08/12/2023

निदेशक प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक) या पदाकरीता दिनांक १२.१२.२०२३ रोजी होणाऱ्या व्यावसायिक चाचणी परीक्षेकरिता पात्र उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना.

तंत्रशिक्षण संचालनालय तथा सर्व विभागीय कार्यालयांच्या नियंत्रणाखालील विविध संस्थांमधील गट क संवर्गातील रिक्त पदे सरळ सेवेने भरती प्रक्रीयेअंतर्गत उमेदवारांची व्यावसायिक चाचणी परीक्षा शासकीय तंत्रनिकेतन, पुणे येथे दिनांक १२.१२.२०२३ रोजी होणार असून, याबाबतची प्रवेशपत्रे संबंधीत उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहेत.

व्यावसायिक चाचणी परीक्षा प्रत्यक्ष प्रयोगशाळेत पार पडेल. ही परीक्षा उमेदवाराने ज्या अभियांत्रिकी शाखेतील पदविका/पदवी धारण केलेली आहे,त्या शाखेशी संबंधीत प्रयोगशाळेत पार पडेल. उमेदवारास प्रयोगशाळेत प्रत्यक्ष उपकरण हाताळणी करणे तसेच प्रात्यक्षिके करणे, प्रयोगशाळेतील जड-संग्रह व इतर अभिलेख आणि अनुषंगिक कामकाज पार पाडण्यासाठीच्या पात्रतेचे मुल्यांकन करुन त्यानुसार गुणांकन करण्यांत येईल.

व्यावसायिक चाचणी परीक्षेस पात्र उमेदवारांनी खालील सूचनांचे पालन करावे.

१) सकाळी ११:०० वाजता परीक्षा सुरु होणाऱ्या उमेदवारांच्या प्रवेशपत्रांची तपासणी संबंधीत विभागामध्ये सकाळी १०:०० वाजता सुरु करण्यात येईल

२) दुपारी १२:३० वाजता परीक्षा सुरु होणाऱ्या उमेदवारांच्या प्रवेशपत्रांची तपासणी संबंधीत विभागामध्ये सकाळी ११:३० वाजता सुरु करण्यात येईल.

३) प्रवेशपत्रांच्या तपासणीसाठी उमेदवारांनी संबंधीत विभागात खालील तक्त्यात नमूद केलेल्या ठिकाणी नेमून दिलेल्या वेळेवर उपस्थित रहावे.

| अ. क्र. | शाखा | प्रवेशपत्र तपासणीचे विभागातील ठिकाण (Venue for Branch-wise Reporting) |
|---|---|---|
| ०१ | Civil Engg., Civil & Rural Engg. | Applied Mechanics Laboratory, Main Building |
| ०२ | Electrical Engg., Electrical Power | Electrical Machine Laboratory, Main Building |
| ०३ | Mechanical, CAD CAM, Chemical, Plastic, Plastic & Polymer, Automobile, Production, Power and Quality Control Engg. | YAMAHA Training School Laboratory, Main Building |
| ०४ | Computer Engg., Computer Technology and Information Technology | Lab No. 1, Ground Floor, Computer Engineering Building |
| ०५ | Electronics, Industrial Electronics, Electronics & Teleommunication, Electronics & Communication, Instrumentation and Medical Electronics | Seminar Hall, Ground Floor, Electronics Engineering Dept. (Near E-Square Cinema, Opposite Main Building, G.P. Pune ) |

४) उमेदवारांनी सदरील परीक्षेस उपस्थित राहतांना त्यांना प्राप्त झालेले Call Letter for Skill Test for the Post of Instructor (Lab Assistant (Technical)) सोबत बाळगणे बंधनकारक आहे.या Call letter वर दिलेल्या जागेत उमेदवाराने passport आकाराचा color फोटो लावून त्यावर स्वाक्षरी करावी.

५) उमेदवाराने त्यांची ओळख पटविण्यासाठी ओळखपत्राची (Aadhar Card/eAadhar Card/Pan Card/Passport/ Driving License/ Election Commission Identity Card/ ID Card issued by Govt. Office) मूळ प्रत व सत्यप्रत असे दोन्हीही सोबत बाळगावी.

6) उमेदवाराने सादर करावयाच्या ओळख पटविण्यासाठी Ration Card आणि Learners' Driving License स्वीकारल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७) उमेदवाराने सादर करावयाच्या ओळख पटविण्यासाठी मूळ ओळख पत्र सोबत बाळगणे बंधनकारक असून color Xerox स्वीकारल्या जाणार नाही व उमेदवारास व्यावसायिक चाचणी परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

8) व्यावसायिक चाचणी परीक्षेदरम्यान संबंधीत विभागातील परिक्षक यांच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

९) परीक्षा सुरु असतांना इतर उमेदवारांसोबत संवाद करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारे अडचण असल्यास फक्त संबंधीत परीक्षक यांनाच पाचारण करावे.

१०) परीक्षा संपल्यावर परीक्षकांच्या सूचनेशिवाय आपले स्थान सोडू नये.

* * * * * * * * * *